**स.फौ.के. नं. १००/२०२४**

**नि. क्र. ०७ लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – प्रशांत सदानंद नागवेकर,

**वय** – ३० वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस शिपाई ब. क्र. १४२३),

**सध्या नेमणूक** – पोलीस ठाणे देवरुख, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u>** –

**०१**. दिनांक १९/०३/२०२४ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी पोलीस ठाणे देवरुख येथे हजर असताना आम्हाला गोपनीय माहिती मिळाली की, देवरुख, पर्शुरामवाडी येथे डोंगराळ भागात वहाळाच्या ठिकाणी एक इसम भट्टी बांधून गावठी दारु गाळतो.

**०२**. त्यावरुन मी, पोलीस उपनिरीक्षक श्री. जाधव, सहा. पो. उपनिरीक्षक ब. क्र. २९९ श्री. डी. एस. पवार, पो.ह. ब.क्र. ४९० श्री. श्रीकांत जाधव, पो.ह. ब.क्र. ७८० श्री. पवार असे आम्ही स्टेशन डायरी क्रमांक ७९/२०२४ मध्ये नोंद क्रमांक १३ सकाळी १०:५२ वाजता करुन सरकारी वाहन क्र. एमएच–०८–एएक्स–७१०३ ने पोलीस ठाणे देवरुख येथून निघून देवरुख, पर्शूरामवाडी येथे गेलो.

**०३**. तेथे पोलीस उपनिरीक्षक श्री. नामेदव जाधव यांनी देवेंद्र शांताराम लाड व संजय सिताराम पर्शराम या दोन इसमांना पंच म्हणून बोलावले. त्यांना छाप्याबाबत माहिती दिली. त्यानंतर पंच व आम्ही पोलीस असे आम्ही पायी शिळाचा पऱ्या येथे आलो. तेथे चार बांबूंच्या सहाय्याने एक प्लॅस्टीक कागदाचे छप्पर टाकुन त्यात दगडाच्या चुलीवर एक इसम बॅरेल ठेवून असलेला आम्हाला दिसला. तो इसम लाकडी चाटू व ॲल्युमीनीअम डेग तसेच त्या डेगला लावलेल्या रबरी पाईपने प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये गावठी दारु गाळीत असलेला दिसला. त्याला आम्ही दुपारी ०१:३५ वाजता ताब्यात घेतले. त्या इसमाला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव राकेश नामदेव मिरजकर, राहणार – देवरुख खालची आळी, मच्छी मार्केटजवळ असे सांगितले.

**०४**. आम्ही ती भट्टी पाण्याने विझवीली. त्या चुलीवरील ३०० लिटर मापाच्या पत्र्याच्या बॅरेलमध्ये एकूण १५० लिटर गुळ व नवसागर मिश्रीत उकळते रसायन होते. तसेच तेथे आम्हाला एक लाकडी चाटू, हंडाभर पाणी मावेल अशी ॲल्युमीनीअमची डेग, एक रबरी पाईप, तीन जळकी विझविलेली लाकडे, प्रत्येकी २० लिटर गावठी दारु असलेले ०२ प्लॅस्टीक कॅन, तसेच प्रत्येकी २०० लिटर मापाचे कुजक्या रसायनाने भरलेले प्लॅस्टीकचे दोन बॅरेल व एक माती मिश्रीत चिंधी असे सर्व साहित्य मिळून आले.

**०५**. तेथे पोलीस उपनिरीक्षक श्री. नामदेव जाधव यांनी तो सर्व मुद्देमाल पंचांसमक्ष पंचनामा करुन ताब्यात घेतला. तसेच त्यांनी उकळते रसायन, कुजके रसायन व गावठी दारु हे नमुणा म्हणून प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या तीन वेगवेगळया बाटल्यांत रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतले. त्या नमूणा बाटल्यांना पंचांच्या व पोलीसांच्या सहयाचे लेबल चिकटविले व सिलबंद केले.

**०६**. तसेच तेथे मिळून आलेले सर्व उकळते रसायन तसेच कुजके रसायन हे त्याठिकाणीच ओतून नाश करण्यात आले. त्याचप्रमाणे, ते लोखंडी बॅरेल व प्लॅस्टीक बॅरेल हे वाहतूकीस अवजड असल्याने तेथेच फोडून नाश करण्यात आले. इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला. तेथे याबाबत पो.ह. ब.क्र. ७८० श्री. सचिन पवार यांनी त्यांच्या मोबाईलद्वारे छायाचित्रे काढले.

**०७**. आम्ही जप्त मुद्देमाल घेवुन पोलीस ठाणे देवरुख येथे आलो. तेथे मी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. मला आता दाखविणेत आलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे (सदर फिर्यादला **निशाणी १५** देणेत आली).

**०८**. मला आता दाखविण्यात आलेले पाच छायाचित्रे तेच आहेत. त्या पाचही छयाचित्रांत तेथे मिळून आलेले साहित्य दिसत आहे. तसेच त्या पाचपैकी तीन छायाचित्रांत आरोपी, पंच, मी स्वतः, पोलीस उपनिरीक्षक श्री. नामदेव जाधव, पो.ह. ब.क्र. ४९० श्री. श्री. श्रीकांत जाधव व सहा. पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील हे दिसत आहेत (सदर छायाचित्रांना **ओळखीकरीता आर्टीकल ०१ ते ०५** देण्यात आले.

०९. ज्या इसमाच्या ताब्यात मुद्देमाल मिळून आला त्या इसमाला पाहिल्यावर मी ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास पुर्ण</u>.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञा श्रीमती एस. ए. गिडये यांचेकडून</u> –**

१०. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये पंचांची नावे नमूद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस उपनिरीक्षक श्री. जाधव यांनी पंचनामा केल्याचे फिर्यादमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तेथे पो.ह. श्री. सचिन पवार यांनी छायाचित्र काढल्याचे फिर्यादमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेला सर्व मुद्देमाल पोलीस ठाण्याच्या मुद्देमाल कक्षात जमा केला जातो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पंचनामा पोलस ठाण्यात तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाण्यातच पंचांच्या सहया पंचनाम्यावर घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला बेवारस स्थीतीत मुद्देमाल मिळून आला.

११. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तेथे गेलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपी मिळून आलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे ताब्यात मुद्देमाल मिळून आलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सॅम्पल घेतलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी संशयावरुन खोटीच फिर्याद आरोपीविरुध्द दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>.**

**<u>फेरतपास नाही</u>.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.02.17 14:11:12 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक –१७.०२.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 17/02/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 17/02/2025 |
| Evidence uploaded on | : | 17/02/2025 |